



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २३५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.०७ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# मेट्रो प्रकल्पांना अखेर मुहूर्त!

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'मेट्रो ९ आणि २ बी'चे उद्घाटन; ७ एप्रिलापासून शुभारंभ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, मुंबई :** मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेला दिलासा देणाऱ्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना अखेर मुहूर्त मिळाला आहे. मंगळवारी, ७ एप्रिल रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मेट्रो मार्गिका ९ (टप्पा १) आणि मेट्रो मार्गिका २ बी (टप्पा १) चे लोकार्पण होणार असून, ठाणे–बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पाच्या कामाचा शुभारंभ आणि पॉड टॅक्सी प्रकल्पाचे भूमिपूजनही याच दिवशी होणार आहे.



**तीन ठिकाणी कार्यक्रम...**

कार्यक्रमाचे आयोजन तीन ठिकाणी करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता दहिसर (पूर्व) मेट्रो स्थानक येथे मेट्रो लाईन ९ संदर्भातील कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर सकाळी ११.३० वाजता ठाण्यातील मानपाडा येथे ठाणे–बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पासाठी टीबीएम लॉन्च करण्यात येणार आहे. दुपारी १२.३० वाजता चेंबूरमधील डायमंड गार्डन मेट्रो स्थानक येथे मेट्रो लाइन २बीचे लोकार्पण आणि पॉड टॅक्सी प्रकल्पाचे ई–भूमिपूजन पार पडणार आहे.

कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची प्रमुख उपस्थिती असेल. एकाच दिवशी चार महत्त्वाच्या प्रकल्पांना गती देत मुंबईच्या पायाभूत सुविधांच्या विस्ताराला मोठा वेग देण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून होत असल्याचे स्पष्ट होत आहे.

मुंबईतील वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर हे सर्व प्रकल्प महत्त्वाचे मानले जात आहेत. त्यामुळे, अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या या प्रकल्पांना अखेर मुहूर्त मिळाल्याने मुंबईकरांसाठी दिलासादायक घडामोड मानली जात आहे.

**मेट्रोची दारे घातपातासाठी खुली**

दरम्यान, मुंबईत पहिली भूमिगत मेट्रो सुरू झाल्यानंतर मुंबईकरांचा प्रवास जलद आणि सुखाचा झाला खरा; मात्र या मेट्रोला पुरविण्यात आलेली सुरक्षा तोकडी असल्याचे समोर आले आहे. प्रत्येक स्थानकात खाली उतरण्यासाठी असलेल्या प्रवेशद्वारावर कोणतीच सुरक्षा नाही. प्रवेशद्वारापासून तपासणी केंद्रापर्यंत (फ्रिस्किंग पॉइंट) सुमारे शंभर ते दोनशे मीटर अंतरावर एकही सुरक्षारक्षक तैनात नाही. निम्म्याहून अधिक स्थानकांतील तपासणी केंद्रांवर तैनात महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांकडे शस्त्रेही नाहीत. जी काही मोजकी शस्त्रे आहेत, ती देखील अद्ययावत नसल्याचे वास्तव आहे.

# मराठी न येणाऱ्या रिक्षा चालकांचा परवाना रद्द होणार...



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०६, ठाणे :** रिक्षाचालकांबाबत वाढत्या तक्रारी आणि परवाना प्रक्रियेत होत असलेल्या कथित गैरप्रकारानंतर राज्य सरकार आता ॲक्शन मोडमध्ये आले आहे. मीरा–भाईंदर परिसरात बोगस कागदपत्रांच्या आधारे रिक्षा आणि टॅक्सी परवाने मिळाल्याच्या तक्रारींनंतर आता परवान्यांची सखोल फेरतपासणी केली जाणार आहे. या परवाना फेरतपासणी दरम्यान रिक्षा चालकांना मराठी येते का, याचीही कसून पडताळणी केली जाणार आहे. तर मराठी बोलता न येणाऱ्या चालकांवर परवाना रद्द करण्याची कारवाई होण्याची शक्यता आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी याबाबत कडक निर्देश दिले असून १ मे पर्यंत अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

भाजपचे आमदार नरेंद्र मेहता यांनी केलेल्या तक्रारीनंतर हा मुद्दा पुढे आला. काही परप्रांतीय आणि परदेशी नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या संगनमताने बनावट कागदपत्रांच्या आधारे रहिवासी दाखले मिळवून रिक्षा आणि टॅक्सी परवाने मिळवल्याचा गंभीर आरोप करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाने ही बाब अत्यंत गंभीर मानत प्रत्येक प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

दरम्यान फक्त चालकांवरच नव्हे तर चुकीच्या पद्धतीने परवाने देणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई होणार असल्याचे स्पष्ट संकेत मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. ऑनलाइन प्रक्रिया असतानाही बोगस कागदपत्रांच्या आधारे परवाने दिल्याच्या तक्रारी गंभीर मानल्या जात आहेत.

# जुगार कारवाईनंतर आरोपांची सरबत्ती शिवाजीनगर पोलिसांची स्पष्ट भूमिका

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.०६, पुणे :** शिवाजीनगर परिसरात उघड झालेल्या प्रकरणाने शहरात चर्चेला उधाण आले असताना, आता पोलिसांनीही आपली अधिकृत भूमिका स्पष्ट केली आहे. संबंधित अर्जदार कोळी याच्यावर मटका–जुगार प्रकरणी आधीच गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांच्या माहितीनुसार, ही कारवाई पूर्णपणे कायदेशीर चौकटीत करण्यात आली असून, त्यानंतरच संबंधित अर्जदाराने पोलिसांवर ₹२ लाख ५० हजार रुपये दिल्याचा आरोप करत गृहमंत्रालय, पुणे पोलीस आयुक्त तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे. मात्र, पोलिसांचा दावा आहे की कारवाई आधीच झाली होती आणि त्यानंतरच हे आरोप पुढे आले, त्यामुळे या प्रकरणातील सत्यता तपासातूनच स्पष्ट होणार

जुगारविरोधी कारवाई ही नियमित मोहीम असून, त्यामध्ये आवश्यक ती सर्व कायदेशीर पावले उचलण्यात आल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, गुन्हा दाखल झाल्यानंतर चार्जशीट न्यायालयात सादर करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, या सर्व आरोपांवर प्रतिक्रिया देताना, गिरीश दिघावकर (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोलीस ठाणे) यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले... संबंधित कोळी याच्यावर आम्ही अगोदरच गुन्हा दाखल केला होता. कोणत्याही प्रकारची पैशांची मागणी करण्यात आलेली नाही. पान–टपरीत व्यवहार किंवा वरिष्ठांना पैसे दिल्याचे आरोप यामध्ये कोणतेही तथ्य नाही.

एकूणच, कारवाईनंतर उभे राहिलेले आरोप आणि पोलिसांची भूमिका यामध्ये मोठा विरोधाभास आहे.

# युद्ध नको, बुद्ध हवा; आठव्या आंतरराष्ट्रीय धम्म परिषदेत उपमुख्यमंत्री शिंदेंनी दिला समतेचा संदेश

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.०६, ठाणे :** बौद्ध हा केवळ धर्म नसून तो एक व्यापक सामाजिक विचारसरणी आहे. तो फक्त श्रद्धेचा विषय नाही, तर परिवर्तनाची चळवळ आहे. ही केवळ धार्मिक क्रांती नसून सामाजिक आणि राजकीय क्रांती होती. बुद्धांचे विचार हे प्रवचनापुरते मर्यादित नसून आचरणासाठी आहेत. बुद्ध पेरले की बाबासाहेब उगवतात, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

सम्राट अशोक जयंतीचं औचित्य साधून ठाण्यात आठव्या आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्म परिषदेचं आयोजन करण्यात आले होते. बुद्धरत्न सागर वेलफेअर फाउंडेशनतर्फे गडकरी रंगायतन येथे हा कार्यक्रम पार पडला. या वेळी मार्गदर्शन करताना शिंदे बोलत होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला नमो बुद्धाय, नमो धम्माय, नमो संघाय या मंत्रोच्चारांनी वातावरण भारावलं. भगवान गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून एकनाथ शिंदे यांनी उपस्थित भिक्खू संघ, विद्वान, विचारवंत आणि धम्मप्रेमी बांधव–भगिनींचं स्वागत केलं.

ठाण्याच्या ऐतिहासिक वारशाचा उल्लेख करत एकनाथ शिंदे म्हणाले की, सम्राट अशोक आणि सातवाहन काळात या भूमीत बौद्ध धर्माचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला होता. कान्हेरी लेणी आणि प्राचीन सोपारा (नालासोपारा) येथील स्तूप व शिलालेख हे त्याचे पुरावे आहेत. त्यामुळे ठाण्यात ही परिषद होणं अभिमानास्पद असल्याचं त्यांनी सांगितलं.

धम्म परिषद ही धम्मचळवळीतील महत्त्वाची घटना असल्याचं सांगत त्यांनी आयोजक भंते रत्नप्रिय थेरो आणि त्यांच्या सहकाऱ्यांचं कौतुक केलं. भिक्खू संघाला संघदान करण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत,



संघदान ही केवळ परंपरा नसून भिक्खू संघाच्या माध्यमातून बुद्धांच्या शिकवणीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची भावना आहे, असं ते म्हणाले.

या परिषदेत एकनाथ शिंदे यांना 'बौद्ध रत्न' पुरस्कार देण्यात आला. या सन्मानाबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त करत, अशा पुरस्कारांमुळे जबाबदारी वाढते आणि समाजासाठी अधिक काम करण्याची प्रेरणा मिळते, असं सांगितलं.

महाकवी वामनदादा कर्डक यांच्या ओळी उद्धृत करत त्यांनी मी वादळ वारा, मी भीमपुत्र आहे मी बुद्धांचा अनुयायी, शांतीचा दूत आहे, असं सांगितलं. मुख्यमंत्री असताना वर्षा निवासस्थानी आयोजित केलेल्या वर्षावास, भोजनदान, धम्मदान आणि चिवरदान कार्यक्रमांचीही त्यांनी आठवण करून दिली.

बौद्ध धम्म हा दुःखातून मुक्ती देणारा मार्ग आहे. सत्य, अहिंसा आणि करूणेवर आधारित जीवनपद्धती म्हणजे धम्म, असं सांगत त्यांनी धम्म हा 'वे ऑफ लाइफ' असल्याचं स्पष्ट केलं. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या धम्मदीक्षेमुळे लाखो लोकांना समानता आणि स्वाभिमानाचा मार्ग मिळाल्याचं त्यांनी नमूद केलं.

बुद्ध पेरला की बाबासाहेब उगवतात, या ओळी उद्धृत करत शिंदे म्हणाले की, गौतम बुद्ध यांनी पेरलेली विचारांची बीजं दलितांच्या हृदयात रुजली, शोषितांच्या रक्तात मिसळली आणि अस्पृश्यांच्या अश्रूंमध्ये भिजली. बुद्धांनी दिलेला धम्म डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नव्या जोमाने समाजात रुजवला. बुद्धांनी दिलेला प्रकाश बाबासाहेबांनी सर्वदूर पोहोचवला आणि ज्या धम्माने जगाला शांततेचा मार्ग दाखवला, त्याच धम्माच्या आधारावर बाबासाहेबांनी दलितांना मुक्ती दिली.

समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही आमच्या सरकारची मार्गदर्शक तत्त्वे आहेत. अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांसाठीच्या योजना शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवण्याचं काम आम्ही करत आहोत, असंही त्यांनी सांगितलं.

जगातील वाढत्या युद्धपरिस्थितीचा संदर्भ देत त्यांनी इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील तणावाचा उल्लेख केला. द्वेषाने द्वेष संपत नाही, प्रेमानेच तो शांत होतो, हा बुद्धांचा संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा असल्याचं त्यांनी नमूद केलं. जगाला युद्ध नको, बुद्ध हवा, असा संदेश त्यांनी दिला.

भौतिक सुखाच्या स्पर्धेत मानसिक शांतता हरवत चालल्याची खंत व्यक्त करत त्यांनी बुद्धांनी दाखवलेला मार्गच मानवतेला तारणारा असल्याचं सांगितलं. बुद्धांना मूर्तीत नव्हे तर विचारात शोधलं पाहिजे, असंही ते म्हणाले.

न तलवार की धार से, न गोलियों की बौछार से दुनिया बदलेगी तो सिर्फ बुद्ध के विचार से, या ओळींनी त्यांनी भाषणाचा समारोप केला.

या वेळी खासदार ज्योती वाघमारे, महापौर शर्मिला पिंपळोलकर, शिवसेना प्रवक्ते राहुल लोंढे, प्रवक्ते किरण सोनावणे, तसेच विविध देशांतून आलेले भिक्खूभन्ते रत्नप्रिय थेरो, विशुद्धारत्न महाथेरो, विनय बोधी महाथेरो, शांतीप्रिय थेरो, भंते डॉ. राजरत्न थेरो, रत्नप्रिय थेरो, तसेच बौद्ध अनुयायी मोठ्या संख्याने उपस्थित होते.

# बालकांच्या कर्करोग उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचा पुढाकार

**दि.०६, मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) फाऊंडेशन आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोगाच्या उपचारासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या प्रकल्पाची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री सहायता कक्ष बीपीसीएल फाउंडेशन आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात हा त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कराराद्वारे सर्व संबंधित घटकांमध्ये समन्वय राखला जाईल आणि प्रकल्पाच्या अंमलबजावणीस गती मिळणार आहे तसेच, प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यक्षेत्र आणि जबाबदाऱ्यांना सर्व संबंधितांनी मान्यता दिली असून, अंतिम सामंजस्य कराराध्ये ठरविण्यात येणाऱ्या अटी व शर्तींचे पालन करण्याबाबत सहमती दर्शविण्यात आली आहे.

**लवकर निदान, परवडणारे उपचार आणि जागरूकता आवश्यक**

या सामंजस्य करारासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुलांचे संरक्षण हे राज्याचे कर्तव्य आहे. कर्करोगाविरुद्ध लढण्यासाठी लवकर निदान , परवडणारे उपचार आणि जागरूकता आवश्यक आहे. शासन आणि समाज दोघांनी मिळून हे काम करणे गरजेचे आहे. टाटा मेमोरियल सेंटर यांनी बालक कर्करोग रुग्णांच्या ऑपरेशनच्या खर्चासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून खर्चाची मागणी केली होती. यासाठी विविध संस्थांनी एकत्रितपणे पुढाकार घेतला आहे. त्यामध्ये बीपीसीएल फाऊंडेशने मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आपला सहभाग नोंदवला आहे. त्यानुसार बीपीसीएल फाऊंडेशन टाटा मेमोरियल सेंटरमध्ये कर्करोगाचे उपचार घेणाऱ्या बालक रुग्णांच्या सहाय्यासाठी योगदान देणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# ठाण्यात ऑनलाइन गेमिंग–लॉटरीचा अवैध धंदा फिरून सुरू...

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०६, ठाणे :** ठाणे आणि परिसरात ऑनलाइन गेमिंग आणि गैरकानूनी लॉटरीचा काळा कारोबार पुन्हा जोरात सुरू झाला आहे. ठाणे, दीवा, मुंब्रा आणि कलवा रेलवे स्टेशन परिसरात खुलेआम चालणारे हे स्टॉल्स प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत.

**विधानसभेत उठला मुद्दा :**

काही महिन्यांपूर्वी विधायक निरंजन डावखरे यांनी विधानसभा मध्ये हा मुद्दा मांडला होता. त्यानंतर प्रशासनाने कारवाईचा दिखावा करत या स्टॉल्स बंद करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र मार्च महिना संपल्यावर हा धंदा पुन्हा जोरात सुरू झाला आहे.

**स्थानीय नागरिकांचा आरोप :**

– मजूर वर्ग आणि दैनिक कमाई करणाऱ्या लोकांना निशाणा बनवले जात आहे.

– कमी गुंतवणूक, जास्त नफा अशा झुठ्या वादांनी लोकांना लालच दाखवून आर्थिक जाळ्यात फसवले जात आहे.

– संबंधित विभागांकडून ठोस आणि सतत कारवाई होत नसल्याने लोकांचा आक्रोश वाढत आहे.

**प्रश्नचिन्ह :**

– या स्टॉल्सवर दिवस–रात कोणतीही रोक–टोक नसताना कारवाई का होत नाही?

– स्थानिक पुलिस आणि नगर निगम प्रशासन यांच्यात तालमेल नाही का?

– या अवैध कारोबारामागे मोठे संरक्षण आहे का?

**विशेषज्ञांचे मत :**

– ऑनलाइन गेमिंग आणि लॉटरीच्या नामावर चालणारा अवैध कारोबार थाळण्यासाठी सतत निगरानी आणि कडक कानूनी कारवाई आवश्यक आहे.

– रेलवे स्टेशन आणि भीडभाड असलेल्या परिसरात विशेष अभियान चलवून या स्टॉल्स बंद करणे आवश्यक आहे.

**ठाणेकऱ्यांची नजर :**

आदल्याने प्रशासनाच्या कार्यवाहीवर ठाणेकऱ्यांची नजर आहे की यावेळी मात्र या काळ्या कारभारावर लगाम लगणार आहे का?

संपादकीय

## भारताचे एडिसन : डॉ शंकर आबाजी भिसे

स्वातंत्र्यपूर्व काळातील थोर भारतीय संशोधक डॉ शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी. त्यांचा जन्म २९ एप्रिल १८६७ रोजी मुंबईत झाला. भारताचे एडिसन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ शंकर आबाजी भिसे या महान शास्त्रज्ञाचा जन्म मुंबईमध्ये एका मॅजिस्ट्रेटच्या घरी झाला. दोनशेच्यावर निरनिराळे शोध लावणारे आणि चाळीसहून अधिक शोधांचे एकस्व संपादन करणाऱ्या डॉ. शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी असल्याने त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे तरीही त्यांचा विसर पडणाऱ्यांचीच संख्या यंदाही अधिक असेल. ज्या काळात भारतीय नागरिकांना कमी लेखले जात होते त्याकाळात डॉ भिसे यांनी संशोधनक्षेत्रात अजोड कार्य केले. लहानपणी एकदा भिसे साखर आणायला वाण्याकडे गेले. त्यावेळी वाण्यानी लबाडी करून कमी वजनाची साखर दिल्याचं त्यांच्या लक्षात आलं. याबाबत त्यांनी व्यापाऱ्याला विचारलं असता माझ्या काट्यावर विश्वास नसेल तर आपोआप वजन करणारं यंत्र शोधून काढ. असं वाण्याने त्यांना खोचकपणे म्हटलं. त्यावेळी एक दिवस तुला असे यंत्र देईन अस छोटा शंकर त्यांना आत्मविश्वासाने म्हणाला. लहानपणापासून संशोधनाची आवड असणाऱ्या डॉ भिसे यांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी दगडी कोळशापासून गॅस शुद्ध करण्याचे यंत्र बनवले. १८९७ मध्ये इन्व्हेंटर रिव्हीव अँड सायंटिफिक रेकॉर्ड या मासिकाने स्वयंमापन यंत्र करण्याची एक स्पर्धा जाहीर केली. स्वयंमापन यंत्र म्हणजे साखर, पीठ इत्यादी वस्तूंचे गिऱ्हाईकाला हवं तेवढं वजन करुन देणारं यंत्र. डॉ भिसे यांनी अशा यंत्राचा आराखडा तयार करून पाठवला. त्यांनी तयार केलेल्या वजन मापन यंत्राच्या आराखड्याला इंग्लंडमध्ये पहिले बक्षीस मिळाले. या स्पर्धेत युरोप आणि अमेरिकेतल्या नामांकित यंत्र शास्त्रज्ञांनी भाग घेतला होता हे विशेष. इंग्लंडमध्ये गेल्यावर त्यांनी छपाईच्या क्षेत्रात अनेक शोध लावले. १९०० साली डॉ भिसे यांचं लक्ष मुद्रण व्यवसायातील यंत्र सामग्रीकडे लागलं. त्या काळी प्रचलित असलेल्या लायनो, मोनो इत्यादी यंत्राची रचना आणि कालमर्यादा यांचा अभ्यास करुन त्यांनी भिसो टाईप या यंत्राचा शोध लावला व त्याचं प्रथम इंग्लंडमध्ये आणि नंतर अमेरिक, जर्मनी, फ्रांस या देशांमध्ये पेटंट घेतले. या यंत्राच्या उत्पादनासाठी सर रतनजी टाटा यांचे सहकार्य मिळवून द टाटा भिसे इन्व्हेशन ही कंपनी १९१० मध्ये लंडन येथे स्थापन केली. पण १९१५ मध्ये ती बंद पडली. त्याच सुमारास दर मिनिटाला साधारण बाराशे अक्षर छापणारं गुणीत मातृका हे यंत्र तयार केलं आणि १९१६ मध्ये विक्रीला आणलं. १९१६ साली भिसे अमेरिकेला गेले तिथे त्यांनी युनिव्हर्सल टाईप क्लस्टर हे यंत्र शोधून काढले आणि अमेरिकेत त्याचं पेटंट घेतले. याशिवाय मुद्रण व्यवसायातली आणखी अनेक यंत्रे त्यांनी तयार केली. १९१० साली साली डॉ भिसे आजारी असताना त्यांच्यावर उपचार करण्यासाठी वापरण्यात आलेलं एक भारतीय औषध फार गुणकारी ठरलं.

या औषधाचं रासायनिक पृथःकरण त्यांनी करवून घेतलं आणि त्याच्या गुणकारीपणा आयोडीनामुळे आहे जाणलं. १९१४ साली डॉ शंकर आबाजी भिसे यांनी स्वतःच एक नवीन औषध तयार केले आणि त्या औषधाला बेसलिन हे नाव दिले. हे औषध बाह्येपचारासाठी उपयुक्त ठरले. पहिल्या महायुद्धात या औषधाचा अमेरिकेने मोठ्या प्रमाणात वापर केला. या औषधामुळे पहिल्या महायुद्धात अनेक सैनिकांचे प्राण वाचले. या औषधावर आणखी संशोधन करून आयोडीन घटक असलेलं पण पोटात घेता येईल असं एक औषध नंतर डॉ भिसेंनी तयार केलं या औषधाला ऑटोमेडीयन असं नाव दिलं. हे औषध बऱ्याच रोगांवर उपयुक्त ठरले. पुढे त्यांनी कपडे धुण्यासाठी एक नवे संयुग तयार केले. डॉ भिसे यांनी विद्युत शास्त्रातही अनेक शोध लावले. डॉ भिसे यांच्या साठाव्या वाढदिवशी इंग्लंडमध्ये त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. या सुमारास त्यांची महान शास्त्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन यांच्याशी भेट झाली. एडिसन यांनीही त्यांच्या संशोधन कार्याचा गौरव केला. डॉ भिसे इंग्लंडमध्ये असताना इंग्लंडचे आफ्रिकेशी युद्ध सुरू झाले. स्वयंचलित तोफा काढण्याची विनंती तेथील कारखानदारांनी डॉ भिसे यांना केली. त्यासाठी डॉ भिसे यांना त्यांनी खूप पैसे देऊ केले, पण आपले संशोधन हे विश्वाच्या कल्याणासाठी असून आपल्या संशोधनातून विश्वाचा संहार होऊ नये अशी त्यांची मानवतावादी भूमिका होती. म्हणूनच त्यांनी ही मागणी नम्रतापूर्वक नाकारली. डॉ भिसे यांनी सुमारे २०० शोध लावले. त्यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे ७ एप्रिल १९३५ रोजी या महान शास्त्रज्ञाचे निधन झाले. संशोधन क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. शासनाने त्यांच्या या महान संशोधकाच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन गौरव करावा.

**- श्याम ठाणेदार**

# बळीराजावर अस्मानी संकट..!!



राज्यावर अवकाळी पावसाच्या संकटाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे.मागील वर्षीही अवकाळीच्या संकटाने शेतकरी हवालदिल झाला होता. या संकटातील पीक पंचनामे पूर्ण होऊन अद्याप शेतकऱ्यांना पुरेसा मोबदला अजूनही मिळालेला नाही. त्यानंतर आता पुन्हा अवकाळीचे पावसाच्या संकटाचे ढग राज्यावर गोळा झाले आहेत. ऋतुचक्र पुढे सरकल्याचा अंदाज काही वर्षांपूर्वी हवामान अभ्यासकांनी व्यक्त केला होता. त्यामुळे दरवर्षीचा मान्सून उशिराने दाखल होण्याचा अंदाजही वर्तवला जात होता, तसेच मान्सूनचा मुक्कामही लांबेल, असेही सांगितले जात होते. त्यानुसार उशिराने दाखल झालेला मान्सून दिवाळीनंतरही परतीचे नाव घेत नसल्याचे मागील वर्षी स्पष्ट झाले होते. त्यामुळे शेतीचे गणित बिघडले होतेच. यंदाही वेळेआधी मान्सून दाखल होण्याची शक्यता वर्तवली जात असताना उन्हाळ्यात आलेल्या पावसाने शेतीचे मोठे नुकसान केले आहे. मार्च ते मे या तीन महिन्यात राज्यात कुठेना कुठे अवकाळी सरी तुरळक बरसतात, परंतु यंदा जुलैच्या अतीवृष्टीची आठवण यावी, असा अवकाळी पाऊस पुणे आणि महाराष्ट्रातील अनेक भागात बरसला, त्यामुळे बागायती, भाजीपाला शेतीचे मोठे नुकसान झालेच. सोबतच नगदी पिकाला मोठा फटका बसला आहे. पश्चिम महाराष्ट्रातला कांदा अवकाळीने पुरता भिजवला आहे. कोकणात आंबा पिकाला अवकाळीचा मोठा फटका बसला असल्याने यंदा भाजीपाल्यासोबतच फळफळावळही महाग होणार आहे. हे अस्मानी संकट असताना आखाती युद्धामुळे इंधनदरवाढ, ठप्प झालेली निर्यात असा दुहेरी फटका शेतकऱ्यांना बसत आहे. या दोन्ही संकटातून मार्ग काढण्यासाठी सरकारी यंत्रणांची कसोटी लागणार आहे.

गारपिट, अवकाळीमुळे झालेल्या नुकसानाचे वेळीच पंचनामे होण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील २९ जिल्ह्यातील २ लाख ४ हजार ८३५ हेक्टर पिकांना अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा फटका बसला आहे. विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, खान्देश असा सगळाच महाराष्ट्र अवकाळीत सापडला आहे. नाशिक, धुळे, अहिल्यानगर आणि जळगाव या चार जिल्ह्यात सर्वाधिक हानी २४ मार्च ते २ एप्रिलदरम्यान नोंदवली आहे. केळी, गहू, हरभरा, ज्वारी, आंबा, टरबूज, मका, भाजीपाला, कलिंगड, डाळिंब, कांदा, संत्रा आणि द्राक्ष पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. निफाड, येवला तालुक्यातील काढणीला आलेल्या द्राक्ष बागांचे मोठे नुकसान झाले आहे.

ही द्राक्षे व्यापाऱ्यांनी नाकारल्याने लाखो रुपयांचे नुकसान झालेला शेतकरी पुरता हतबल झाला आहे. छत्रपती संभाजीनगरात १४ दिवसांत जिल्ह्यात ११,००० हेक्टरवरील पिकांना अवकाळीचा फटका बसला असून १८ हजार शेतकरी कमालीच्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत. नंदूरबारमधील ६२ गावातील ९५४ शेतकऱ्यांच्या ८३२ हेक्टर पिकांचे नुकसान झाले आहे. यात ज्वारी, मका कांद्याचे नुकसान सर्वाधिक आहे. नांदेडमधील गारपिटीने शेतीसह जनावरांचे गोठे, शेतकऱ्यांच्या घरांचेही मोठे नुकसान झाले. यवतमाळमध्ये ६ तालुक्यांमधील १४ गावांत १९० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. तसेच ५ घरे कोसळली आहेत.

नगर जिल्ह्यात ३ हजार ५५९ हेक्टरवरील पिकांचे नुकसान नोंदवले गेले आहे. असेच नुकसान धाराशिव, लातूर, सोलापूर, बीड आदी भागात नोंदवले गेले आहे. महसूल आणि कृषी विभागाकडून युद्धपातळीवर पीक पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, सोबतच ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पहिल्या टप्प्यात भरपाई दिली जाणार असल्याचे सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

हा पहिला टप्पा ज्या वेळी संपेल त्यानंतर उर्वरित शेतकऱ्यांना भरपाई दिली जाईल का?, पीक पंचनामे कधीपर्यंत पूर्ण केले जातील? नुकसान झालेल्या सर्वच शेतकऱ्यांच्या भरपाईचे निकष कसे असतील, यातून खरोखर आर्थिक मदतीची गरज असलेल्या शेतकऱ्यांसाठी मदतीचे नियोजन कसे केले जाणार आहे? आदी प्रश्न यातून समोर आले आहेत. अवकाळी पावसाची किंवा गारपिटीची ही पहिलीच वेळ नाही, याआधीही महाराष्ट्रात अनेकदा हे संकट येऊन गेले आहे.

परंतु यंदाची गारपिट तुलनेने जास्त नुकसान करणारी असल्याचे स्पष्ट व्हावे. त्यामुळे शेतकऱ्यांना होणाऱ्या सरकारी मदतीसाठी शेतकऱ्यांच्या बाजूने सहानुभूतीचे धोरण ठेवतानाच निकषातील तांत्रिक आणि प्रशासकीय नियमांची कठोरता सौम्य करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना तातडीने मदत देताना शेतकऱ्याला तीन महिन्यांवर आलेल्या पावसाळी हंगामासाठी पुन्हा सक्षमपणे तयार करण्यावर भर द्यायला हवा. अवकाळीने रब्बीचा हंगामावर पुरते पाणी फेरले असल्याने आता खरीपाकडूनच शेतकऱ्यांना आशा आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्याला पुन्हा उभे करण्यासाठी खरीपातील बि-बियाणे, खतं आणि मशागतीसाठी पुरेसे आर्थिक पाठबळ उपलब्ध करण्याची गरज आहे. त्यासाठी पीककर्ज, पंचनामे आणि पीक विमा या तीन घटकांतील लाभांश शेतकऱ्यांपर्यंत वेळीच पोहचता व्हायला हवा. त्यासाठी प्रशासकीय स्तरावरील नियम थोडेफार शिथील करण्याची गरज आहे. यंदा जोरदार आणि दीर्घकालीन पावसाची शक्यता वर्तवली जात आहे, त्या दृष्टीने येत्या पावसाळ्यात शेतकऱ्यांना पुरेसे मार्गदर्शन करण्यासाठी कृषी विभाग, हवामान खाते आणि सरकारी यंत्रणांमध्ये योग्य समन्वयाची आवश्यकता आहे. 'अस्मानी'चे संकट टाळता येत नाही, मात्र 'सरकार'कडून शेतकऱ्यांच्या वेदनेची तीव्रता कमी करता येणे नक्कीच शक्य आहे, तेवढे तरी करावे हीच अपेक्षा.

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी,**
**कागल-कोल्हापूर**

# दिवा पोलीस स्टेशन अजून ही दिवेकर नागरिकांच्या प्रतीक्षेतच का..?

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०६, दिवा (ठाणे) :** दिव्यात अलीकडील काळात गुन्हेगारीत झालेल्या वाढीमुळे दिवा येथे स्वतंत्र पोलीस ठाण्याची सुरु करण्याची मागणी अधिक तीव्र झाली आहे. ५ लाखांहून अधिक लोकसंख्या असूनही, या भागाला अजूनही मुंब्रा पोलीस ठाण्याअंतर्गत असलेल्या एका लहान पोलीस चौकीद्वारेच सेवा दिली जाते, जिथे कमीत कमी पोलीस अधिकारी कार्यरत आहेत.

मोठ्या गुन्ह्यांसाठी, रहिवाशांना मुंब्रा पोलीस स्टेशनपर्यंत १० ते १४ किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. या मार्गात कचरा टाकण्याचे ठिकाण आणि एक खाडी ओलांडणारा २ किलोमीटरचा निर्जन भाग येतो; या भागांमध्ये



पूर्वी गुन्हेगारीच्या घटना घडल्याच्या नोंदी आहेत.

स्थानिकांच्या मते, यामुळे तक्रार दाखल करण्यासाठी प्रवास करताना पीडितांना पुन्हा लक्ष्य केले जाण्याचा धोका निर्माण होतो.

सध्या, दिवा चौकी केवळ अजामीनपात्र (NC) गुन्ह्यांची नोंद करू शकते, तर रहिवाशांना एफआयआर दाखल करण्यासाठी मुंब्रा पोलीस ठाण्यात जावे लागते. गंभीर कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीत, दिवा येथील सात जणांचे पथक अपुरे पडते आणि मुंब्रामधून अतिरिक्त कुमक येण्याची वाट पाहिल्याने कारवाईस विलंब होऊ शकतो व परिस्थिती आणखी बिघडू शकते. महायुतीच्या सत्ताधाऱ्यांनी महापालिका निवडणुकीच्या तोंडावर मोठ्या दिमाखात नवीन पोलीस स्टेशनचा पाहणी दौरा करून दिव्यातील नागरिकांना गाजर दाखवले होते. अद्याप निवडणूकिला ही काही महिने होऊन गेले असताना पोलीस स्टेशन सुरु झाले नाही. ही मोठी खेदाची बाब आहे.

**दिवा-शिळ भाजप मंडळ अध्यक्ष सचिव भोईर आक्रमक**

ठाणे महापालिकेच्या निवडणुकीत पाहणी दौऱ्यात सत्ताधारी पक्षाच्या नगरसेवकांनी पोलीस स्टेशन चे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे असे सांगितले असताना घोड कुठे अडलं, दिव्यातील सर्व सामान्यांसाठी दिवा पोलीस स्टेशन लवकरात लवकर सुरु करण्यात यावे, असा आक्रमक पवित्रा दिवा मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांनी घेतली आहे.

# या जगात काहीच शाश्वत नाही!

या पृथ्वीवर पहिला सजीव, म्हणजेच एकपेशीय अमीबा, सुमारे ४५० कोटी वर्षांपूर्वी निर्माण झाला. तेव्हापासून वनस्पती, प्राणी, कृमी, कीटक आणि मानव अशा सजीवांचा विस्तार या पृथ्वीवर होत गेला. आज अस्तित्वात असलेल्या सजीवांइतके, किंबहुना त्याहून अधिक सजीव नामशेष झाले आहेत. डायनासोरसारखे प्रचंड सजीव आज अस्तित्वात नाहीत; अनेक प्रजाती काळाच्या ओघात नष्ट झाल्या आहेत.

माणूस हा एकमेव सजीव आहे ज्याला या जगाची, त्याच्या उत्पत्तीची आणि आजूबाजूला घडणाऱ्या नैसर्गिक घटनांची कार्यकारणमीमांसा समजते. विज्ञान, भूगोल, इतिहास, गणित अशा विविध विषयांचे ज्ञान त्याने आत्मसात केले आहे. आपल्या जीवनाला सुखकर करण्यासाठी माणसाने निसर्गालाच आपल्या कवेत घेतले आहे.

शंभर वर्षांच्या आयुष्यात अधिकाधिक सुख मिळावे यासाठी त्याने असंख्य सुविधा निर्माण केल्या आहेत. इतकेच नव्हे, तर पुढील पिढ्यांसाठीही त्याने अमाप ज्ञान, भौतिक साधने, माहिती आणि तंत्रज्ञानाची देणगी ठेवली आहे. आरामदायी घरे, जलद आणि सुरक्षित दळणवळणाच्या सुविधा, आजारांवर औषधोपचार, विविध रुचकर अन्नपदार्थ, आकर्षक वस्त्रे, तसेच नृत्य, नाट्य, अभिनय, चित्रकला, शिल्पकला यांसारख्या कलांचे विश्वहे सर्व त्याने विकसित केले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर तो आज प्रगत मानव बनला आहे. मानवाच्या या प्रगतीचे टप्पे खरोखरच थक्क करणारे आहेत.

परंतु, हेही लक्षात ठेवले पाहिजे की या जगात कोणतीही गोष्ट शाश्वत नाही!

डार्विनच्या सिद्धांतानुसार, नैसर्गिक निवडीच्या प्रक्रियेतून सजीवांची उत्क्रांती होत असते. पुनरुत्पादन, संततीची वाढ आणि अस्तित्वासाठीची झुंज हे मानवासह सर्व सजीवांच्या जीवनाचे अविभाज्य घटक आहेत. जेव्हा संततीची संख्या मर्यादेपलीकडे वाढते, संसाधनांवर ताण येतो आणि स्पर्धा तीव्र होते, तेव्हा नैसर्गिक निवडीचा नियम कार्यान्वित होतो. त्यातून सक्षम सजीव टिकून राहतात, तर दुर्बल नष्ट होत जातात. हा नियम सूक्ष्म जीवांपासून ते गुंतागुंतीची शरीररचना असणाऱ्या प्राण्यांपर्यंत सर्वांनाच लागू होतो. त्यामुळे माणसासह कोणताही सजीव या जगात शाश्वत नाही. फक्त आपले जीवनच नव्हे, तर आपण ज्या पृथ्वीवर राहतो, ज्या सूर्यमालेत आणि या अफाट अवकाशात अस्तित्वात आहोत, ते देखील शाश्वत नाहीही जाणीव कधी कधी मनाला उदास करते.

परंतु, याच अशाश्वतेची जाणीव माणसाला वास्तवात ठेवते. ती त्याला हवेत उडण्यापेक्षा जमिनीवर पाय ठेवून चालायला शिकवते.

**तू लाख इफाजत कर ले,**
**तू लाख करे रखवाली;**
**उड़ जाएगा एक दिन पंछी,**
**रहेगा पिंजरा खाली।**
**ना कोई शोहरत होगी,**
**ना कोई गुमान होगा;**
**जो दौलत आज है तेरी,**
**वो कल गैरों का धन होगा।**

ही कव्वालीची ओळच धन, दौलत, सत्ता, कीर्ती आणि पराक्रम यांसारख्या मानवी मोहांना एका क्षणात भेदून टाकते.

म्हणूनच जगण्याचा खरा अर्थ 'काय मिळवलं' यात नसून 'कसं जगलो' यात आहे. कारण शेवटी, हातात काहीच राहत नाही राहतात ते फक्त आपल्या कृतींचे ठसे आणि आठवणींचे प्रतिबिंब. जगात काही शाश्वत नाही! बदल हा निसर्गाचा नियम आहे! ही जाणीव हा पण सतत ठेवली पाहिजे. कोणत्या गोष्टीला किती महत्त्व द्यायचे आणि त्या गोष्टीला किती चिकटून राहायचे याचे भान आले तरच आपण प्रबुद्ध होऊ. मोठीतून निसटणाऱ्या वाळू प्रमाणे आपल्या जीवनातील क्षण निघून जातात तसतसे जीवनातील अशाश्वता गडद होत जाते. कोणीही दीर्घकाळ विजेता राहू शकत नाही. कोणीही अमरपट्टा घालून आला नाही. कोणीही सर्व शक्तिमान नाही . कोणीही सर्वज्ञानी नाही. थोडक्यात या जगात काहीच शाश्वत नाही.

**– किशोर जाधव, सोलापूर**
**– मो.. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

## पेण एजन्सीतून गॅस पुरवठा सुरु करावा; या मागणीसाठी तहसीलदारांना निवेदन




**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०६, पेण (रायगड) :** वरसई विभागातील जावळी, वरसई, करोटी, वाशिवली ग्रामपंचायतींच्या वतीने गॅस सिलेंडर पुरवठ्याबाबत पेण तहसील कार्यालयात निवेदन दिले असून नायब तहसीलदार प्रसाद काळेकर, पुरवठा अधिकारी सतीश शिंदे यांच्या कडे निवेदन सादर करण्यात आले.या निवेदनात खोपोली येथून होत असलेला गॅस पुरवठा तात्काळ बंद करून पेण येथील एजन्सीकडून पूर्वीप्रमाणे पुरवठा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. मागील २ वर्षांपासून कोणतीही पूर्वसूचना न देता गॅस पुरवठा खोपोली येथील एजन्सीकडे वळविण्यात आल्यामुळे वरसई विभागातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गॅस सिलेंडर भरण्यासाठी किंवा नवीन कनेक्शनसाठी नागरिकांना सुमारे ३० ते ३५ किलोमीटर अंतर पार करून खोपोली येथे जावे लागत असल्याने विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक व सर्वसामान्य कुटुंबे त्रस्त झाली आहेत.या पार्श्वभूमीवर या वरसई विभागतील ४ ग्रामपंचायतीं एकत्र येत तहसीलदारांना निवेदन सादर केले असून, नागरिकांच्या समस्या लक्षात घेऊन गॅस पुरवठा पुन्हा पेण येथून सुरू करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने या निवेदनाची तात्काळ दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयवंत नारकर, बालगंगा संघर्ष समिती अध्यक्ष अविनाश पाटील, वरसई मा सरपंच चंद्रकांत होजगे, गागोदे खुर्द सरपंच शिवाजी पाटील, वाशिवली उपसरपंच नंदकुमार पाटील, करोटी उपसरपंच लक्ष्मण दिवेकर, आणा सकपाळ, महेंद्र पवार, अक्षय पाटील आदी उपस्थित होते.

## सिंबॉल ऑफ नॉलेजला मानवंदना; सलग १२ तास वाचन उपक्रम उत्साहात



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०६, नागपूर :** विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ व रमाई महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने, महात्मा ज्योतिराव फुले यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त अभ्यासिका – सलग १२ तास वाचन हा उपक्रम नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. ज्ञानाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृतीला मानवंदना अर्पण केली.सकाळी ८ वाजता सुरू झालेला हा उपक्रम सायंकाळी ८ वाजेपर्यंत अखंडपणे चालू होता. या दरम्यान मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वाचनाचा आनंद घेतला. संपूर्ण वातावरण अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी झाले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन अधीक्षक अभियंता विलासकुमार उके यांच्या हस्ते करण्यात आले. समारोपावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना विलासकुमार उके यांनी विद्यार्थ्यांना सातत्य, परिश्रम आणि वाचनाची सवय हीच यशाची गुरुकिल्ली असल्याचे सांगत मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी उपस्थित विद्यार्थ्यांना नवी ऊर्जा मिळाली. यावेळी रमाई महिला मंडळाच्या सचिव प्रतीक्षा ताई यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांविषयी मार्गदर्शन करत योग्य नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि आत्मविश्वासाचे महत्त्व पटवून दिले. उपक्रमादरम्यान सहभागी विद्यार्थ्यांसाठी सकाळी व सायंकाळी चहा–नाश्त्याची व्यवस्था वानखेडे यांच्यातर्फे करण्यात आली. तसेच सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, चॉकलेट व पेन देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष इंदल कुमार शामकुवर, सचिव मयूर वासनिक, तसेच रमाई महिला मंडळाच्या अध्यक्षा दीक्षाताई वासनिक व कोषाध्यक्ष वर्षाताई पौनीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोषाध्यक्ष कुलदीप खोब्रागडे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन मयूर वासनिक यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोरेश्वर लाडे, मिलिंद रंगारी तसेच उत्तमकुमार भलावी यांनी विशेष परिश्रम घेतले. अत्यंत शांत, शिस्तबद्ध आणि अभ्यासपूर्ण वातावरणात पार पडलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून, वाचन संस्कृतीला बळ देणारा ठरला आहे.

## शिरवळ जिमखान्यासाठी सुसज्ज इमारत उभी करु - उदय कबुले



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०६, खंडाळा (सातारा) :** शिरवळ जिमखाना आयोजित खुल्या दुहेरी बॅडमिंटन स्पर्धेच्या बक्षिस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलताना सातारा जिल्हा परीषदेचे माजी अध्यक्ष उदय कबुले म्हणाले शिरवळ जिमखाना नवीन पिढी घडविण्याचे कार्य करत आहे. म्हणजेच पर्यायाने राष्ट्रनिर्मितीचे कार्य करीत आहे. तसेच यावेळी शिरवळ जिमखाना अध्यक्ष डॉ.विजय शिंदे यांनी शिरवळमध्ये खेळाडु घडविण्यासाठी व विविध खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी अद्यावयत इमारतीचे आवश्यकता आहे. असे प्रतिपादन केले. यास सकारात्मक प्रतिसाद देत त्यांनी माजी सभापती राजेंद्र तॉबे व माझ्यावतीने नामदार मकरंद पाटील यांचे माध्यामातुन अश्याप्रकारची इमारत नजीकच्या काळात शिरवळमध्ये उभी केली जाईल असेही सांगितले. राजेंद्र तांबे यानी शिरवळ जिमखान्याला शुभेच्छा देत यशस्वी खेळाडुंचे अभिनंदन केले. यावेळी जिल्हा परिषद सदस्यपदी फेर निवड झाल्याबद्दल उदय कबुले यांचा सत्कार करण्यात आला.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक कुणाल गायकवाड, अभिषेक राठोड द्वितीय क्रमांक संदीप गायकवाड, प्रशांत कबुले तृतीय क्रमांक रुद्रप्रताप सिंग, शिवकुमार गौंडा चतुर्थ क्रमांक डॉ कैलास भानुसे, अभि कश्यप यांनी प्राप्त केला. स्पर्धेचे उद्घाटन शिरवळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यशवंत नलवडे यांनी केले. स्पर्धेत लोणंद, भोर, शिरवळ, कापुरहोळ येथुन सुमारे २० संघ यामध्ये सहभागी झाले होते.

सर्व सामने अत्यंत चुरशीने पार पाडले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी जिमखाना अध्यक्ष डॉ.विजय शिंदे, सचिव प्रा डॉ.गणेश भुतकर बॅडमिटन प्रभारी रमेश चव्हाण, सदस्य प्रशांत कबुले, कुणाल गायकवाड, नितीन कोंडे, डॉ.मारुती शिंदे, निलेश होमकर व सर्व सदस्यांनी विशेष परीश्रम घेतले.

# अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद् आढावा बैठक

## महात्मा फुले जयंती द्विशताब्दी कार्यक्रमांचे आयोजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** अखिल भारतीय अहिल्यानगर दक्षिण जिल्ह्यातील ओबीसी संघटनांचे पदाधिकारी व समता सैनिकांची महात्मा फुले समता परिषद आढावा बैठक सोमवार, दिनांक ०६ एप्रिल २०२६ रोजी सुपा (ता. पारनेर) येथील शासकीय विश्रामगृह येथे समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे यांच्या अध्यक्षतेत संपन्न झाली.

या बैठकीत उपस्थित पदाधिकाऱ्यांशी ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ हा कालावधी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासंदर्भात तसेच विविध विषयांवर सखोल संवाद साधत, संघटनेच्या भविष्यातील वाटचालीबाबत मते जाणून घेतली. समता, सामाजिक न्याय आणि संघटन बळकटीकरणाच्या दिशेने निर्धार अधिक दृढ करावा, तसेच ओबीसी समाजाच्या हक्कांच्या लढ्याला अधिक बळकटी देण्यासाठी व संघटनेचे कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी, प्रत्येक समतासैनिकाने जबाबदारीने आणि झोकून देऊन काम करण्याच्या सूचनाही जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे यांनी दिल्या.

यावेळी जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, कार्याध्यक्ष अर्जुन मेहेत्रे, महिला अध्यक्षा संगीता ढवळे, पारनेर तालुकाध्यक्ष नवनाथ खामकर, उपाध्यक्ष वसंत रांधवण, प्रसाद भडके,सोमनाथ धाडगे, संभाजी गदादे, बबनराव घुमटकर, नागनाथ वाळके, सुनील शिंदे व सर्व ओबीसी संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासह समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**जबाबदारीने काम करण्याच्या सूचना**

या बैठकीत नवीन जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. ओबीसी संघटनाचे पदाधिकारी व समतासैनिकांकडून आलेल्या सखोल, मार्गदर्शक आणि रचनात्मक सूचना हे संघटनेच्या भविष्याचा मार्ग उजळवणारे आहेत. या सूचनांचा योग्य अभ्यास करून त्यांचा अंमल करण्यात येईल, याची खात्री ही यावेळी देण्यात आली.

## जिल्ह्यात 'डिजिटल जनगणने' ची तयारी सुरु; ६४ फिल्ड ट्रेनर्सच्या प्रशिक्षणाने मोहीम सुरू

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, ठाणे :** भारतीय जनगणना २०२७ च्या प्रक्रियेला ठाणे जिल्ह्यात सुरुवात झाली असून जिल्हा प्रशासनाने यासाठी कंबर कसली आहे. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणाऱ्या या जनगणनेसाठी ठाणे जिल्ह्यात जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे.या मोहिमेच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून सोमवार, दि.०६ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील पाचव्या मजल्यावरील समिती सभागृहात फिल्ड ट्रेनर्सच्या प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला.

तहसिलदार (सर्वसाधारण) सचिन चौधर यांच्या उपस्थितीत सुरू झालेल्या या प्रशिक्षण वर्गातून जिल्ह्यातील तांत्रिक मनुष्यबळ सज्ज केले जात आहे.उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रूपाली भालके यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली हे संपूर्ण नियोजन करण्यात आले असून, प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक प्रगणकापर्यंत अचूक माहिती पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, या प्रशिक्षणासाठी ३२–३२ जणांच्या दोन स्वतंत्र बॅचेस तयार करण्यात आल्या असून एकूण ६४ फिल्ड ट्रेनर्सना प्रशिक्षित केले जात आहे. हे प्रशिक्षण ११ एप्रिल २०२६ पर्यंत चालणार असून मास्टर ट्रेनर म्हणून कल्याणचे तहसिलदार (अकृषिक) विनोद भामरे आणि तहसिलदार (सं.गा.यो मनपा क्षेत्र) स्वाती घोंगडे हे तज्ज्ञ मार्गदर्शन करीत आहेत.

या प्रशिक्षणात प्रामुख्याने जनगणना– २०२७ चा पहिला टप्पा असलेल्या घरयादी व घरगणनेवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. डिजिटल स्वरूपामुळे यावेळी प्रगणकांना कागदी अर्जांऐवजी सीएमएमएस (CMMS) पोर्टल आणि एचएलबीसी (HLBC) ॲपचा वापर करावा लागणार आहे. या ॲपचे तांत्रिक ज्ञान, जनगणना कायदा व नियम, आणि माहिती संकलनाची प्रक्रिया याबाबत या ६४ फिल्ड ट्रेनर्सना हँड्स–ऑन ट्रेनिंग दिले जात आहे. हे प्रशिक्षित ट्रेनर्स पुढे २७ एप्रिल ते ८ मे २०२६ या कालावधीत प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी ठाणे यांच्या अधिनस्त असलेल्या ९ चार्जमधील सुमारे ४ हजार प्रगणक आणि पर्यवेक्षकांना सज्ज करणार आहेत.



जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी या प्रक्रियेत अचूकतेचे महत्त्व अधोरेखित केले असून डिजिटल सुविधेमुळे डेटा संकलनात पारदर्शकता येईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे, या जनगणनेत नागरिकांसाठी प्रथमच 'स्व–गणना' म्हणजेच सेल्फ– इन्यूमरेशनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत शासनाच्या अधिकृत वेबपोर्टलवर लॉगीन करून स्वतःची माहिती नोंदवावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत घरयादी आणि घरगणनेचा पहिला टप्पा राबविला जाणार आहे. उपजिल्हाधिकारी रूपाली भालके यांच्या नियोजनाखाली जिल्ह्याचा कोणताही भाग या प्रक्रियेतून सुटू नये आणि माहितीचे संकलन विहित वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी जिल्हा प्रशासनाची यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत झाली आहे.

# वाड्या-वस्त्यांवरील कच्चे रस्ते पक्के व्हावे - आ.दाते

## नारायण गव्हाण कांडेकर दरा रस्ता कामास सुरुवात



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** गेल्या विधानसभा निवडणूकीतील विजय संपादन केल्यापासून तालुक्यातील वाड्या– वस्त्यांवरील कच्च्या रस्त्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी आपण सातत्याने पुढाकार घेत असून नुकतेच पुन्हा एकदा नव्याने नारायणगव्हाण येथील कांडेकर दरा रस्ता सुधारणा कामाचे भूमिपूजन करताना आ. दाते बोलत होते. शासनाच्या २५१५ योजना अंतर्गत १५ लाख रुपयांच्या निधीतून या कामास मंजुरी देण्यात आली आहे. यावेळी बोलताना आ.दाते म्हणाले, ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार रस्ते सुविधा मिळणे अत्यावश्यक आहे. वाड्या–वस्त्यांवरील कच्चे रस्ते पक्के करण्यासाठी आपण कटिबद्ध असून या कामांमुळे नागरिकांच्या दळणवळणाच्या अडचणी दूर होऊन विकासाला गती मिळणार आहे.

या कार्यक्रमास माजी सभापती गणेश शेळके, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, तालुकाध्यक्ष सुनील थोरात, सुखदेव पवार, सागर मैड, राष्ट्रवादी महिला अध्यक्षा सुषमा रावडे, सरपंच सुरेश बो–हुडे, भाजप नेते काशिनाथ नवले, तारा दरेकर, बाळासाहेब चव्हाण, बाळासाहेब नवले, हेमंत कांडेकर, पत्रकार दिपक करंजुले, सहादु शेळके, पोपटराव नाईक, मेजर काशिनाथ नवले, मेजर विठ्ठल कांडेकर, मेजर सतीश गाडेकर, हुसेन शेख, धनंजय नाईक, सचिन कांडेकर, शंकरराव कांडेकर, संदीप कांडेकर, सुर्यभान कांडेकर, पांडुरंग शेळके, गणेश नवले, विष्णू दरेकर, भानुदास वेताळ, अविनाश टुडे, फक्कडराव शेळके, नारायण कांडेकर, लताबाई कांडेकर, मनीषा कांडेकर, शीतल कांडेकर आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याच्या कामाला अखेर गती मिळाली असून ग्रामस्थांसाठी हा अत्यंत दिलासादायक निर्णय आहे. आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रयत्नांमुळे हे काम मार्गी लागले असून यामुळे गावाच्या विकासाला निश्चितच चालना मिळेल.

**- सुरेश बो-हुडे, मा.सरपंच नारायण गव्हाण**

## महापुरुषांचे पुतळे उभारताना शासनाच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे - सहाय्यक पोलीस अधीक्षक डगळे

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०५, पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात थोर पुरुषांचे पुतळे उभारण्या बाबतचा परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा. काही ठिकाणी विनापरवानगी अति उत्साहात चुकीच्या ठिकाणी पुतळे उभारतात. हे अत्यंत चुकीचे असून थोर महापुरुषांचे पुतळे उभारताना राज्य शासनाने मार्गदर्शक तत्वे जरी केले असून त्या तत्त्वांचे पालन करावे असे आवाहन सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांनी केले आहे. दिनांक ०५ एप्रिल २०२६ रोजी भोसे तालुका पंढरपूर या ठिकाणी पहाटे चार ते पाच वाजण्याच्या दरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांचा सिंहासनावर आरूढ असलेला पुतळा भोसे येथील चौकात बसविण्यात आला होता. या पुतळ्यासाठी पूर्वपरवानगी व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली गेली नव्हती या अनुषंगाने पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन ,जिल्हा परिषद प्रशासन यांनी या गोष्टीची तात्काळ दखल घेऊन तेथील सरपंच, पदाधिकारी जेष्ठ नागरिक तसेच युवक व ग्रामस्थ यांच्या याबाबत सोबत विविध चर्चा करण्यात आली.पुतळा बसविल्यानंतर परवानगी बाबतची प्रक्रिया पार पाडावी असा गैरसमज निर्माण झाले असल्याचे प्रशासनाने तेथील ग्रामस्थांच्या लक्षात आणून दिले. भोसे गावातील ग्रामस्थांनी प्रशासनाच्या विनंतीला मान देऊन पुतळा स्थलांतरित करून सुरक्षित स्थळी ठेवला.सदर पुतळा उभारण्यासाठी ग्रामस्थांनी रीतसर अर्ज केला असून, परवानगी मिळाल्याने गाजत बसवावा. तसेच आवश्यक सुशोभीकरण करावे.भोसे ग्रामस्थांनी सोलापूर जिल्ह्यासह राज्यात पुतळा उभारणे बाबतचा आदर्श समोर ठेवला असून रीतसर परवानगी घेऊनच पुतळा उभारला जाणार आहे. पुतळा उभारण्याबाबत योग्य मार्गदर्शनासाठी मंगळवार, दिनांक ७ एप्रिल २०२६ रोजी प्रांताअधिकारी सचिन इतापे, तहसीलदार सचिन लंगुटे तसेच सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील पोलीस पाटील, सरपंच, तलाठी, ग्रामसेवक यांची बैठक आयोजित करण्यात आली असल्याचेही सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी सांगितले.

# लोणार येथे आज भव्य 'योग महोत्सव'

## प्रशासनाने यशस्वी आयोजनासाठी सज्ज राहावे - केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, बुलढाणा :** जगप्रसिद्ध लोणार सरोवर परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे मंगळवार, दिनांक ०७ एप्रिल २०२६ रोजी भव्य 'योग महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर 'काउंटडाऊन' उपक्रमाचा भाग म्हणून साजऱ्या होणाऱ्या या महोत्सवात सर्व शासकीय यंत्रणांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.महोत्सवाच्या नियोजनासंदर्भात लोणार येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आयुष विभागाच्या सहसचिव मोनालिसा दास, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी,




मुरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थान चे संचालक डॉ. काशिनाथ समघंडी, कार्यक्रम अधिकारी डॉ. ईश्वर आचार्य यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.आंतरराष्ट्रीय योग दिनाला अवघे ७५ दिवस शिल्लक असताना योगाचा व्यापक प्रचार-प्रसार व्हावा, या उद्देशाने आयुष मंत्रालयाच्या वतीने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात ७ हजारांहून अधिक योगसाधक सहभागी होणार असल्याची माहिती देताना प्रतापराव जाधव यांनी योग ही भारतीय संस्कृतीतील प्राचीन परंपरा असून शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधणारी जीवनशैली असल्याचे सांगितले.

महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यक्रमाच्या ठिकाणी पार्किंग व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, सुरक्षा व्यवस्था तसेच गर्दी नियंत्रण याबाबत सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. तसेच शासकीय अधिकारी, कर्मचारी, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग सुनिश्चित करण्याचे आवाहन करण्यात आले.या योग महोत्सवाच्या माध्यमातून लोणार सरोवर या पर्यटन स्थळाला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळण्यास मदत होणार असून, एकाच वेळी सर्वाधिक लोकांनी 'त्रिकोणासन' करण्याचा विक्रम नोंदवत एशियन बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या उपक्रमात इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन, योग विद्या गुरुकुल, क्रीडा भारती, पतंजली योग संस्थान, आर्ट ऑफ लिव्हिंग, महिला बचत गट तसेच शाळकरी विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

# थोडक्यात

## हनुमान जयंतीनिमित्त आयोजित महाप्रसादातून ऐक्याचा संदेश - सुलेखा कुंभारे

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.०६, कामठी (नागपूर) :** प्रभू श्री रामाचे परमभक्त श्री हनुमान जन्मोत्सव निमित्त कामठी येथील निंबाजी अखाडा हनुमान मंदिर परिसर येथे श्री निंबाजी कौशल्य विकास संस्थाच्या वतीने व कामठी नगर परिषदचे माजी उपाध्यक्ष अजय कदम यांच्या पुढाकाराने आयोजित भव्य महाप्रसादाच्या धार्मिक सोहळ्याने शहरातील हजारो भाविकांना भक्तीरसात न्हाऊ घातले व या भव्य महाप्रसाद वितरण उपक्रमाने सामाजिक एकात्मतेचे आणि श्रद्धेचे अद्वितीय दर्शन घडवले. तसेच 'सेवा हीच खरी भक्ती'या भावनेने प्रेरित होऊन साकारलेला हा महाप्रसाद कार्यक्रम शहराच्या सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेचा अभिमान वाढवणारा असल्याचे मौलिक प्रतिपादन माजी राज्यमंत्री ॲड सुलेखा कुंभारे यांनी या महाप्रसाद वितरण कार्यक्रमात व्यक्त केले. याप्रसंगी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सुरेश भोयर, शहराध्यक्ष धीरज यादव, कामठी नगर परिषदचे विरोधी गट नेता नगरसेवक काशीनाथ प्रधान, अश्विन अजय कदम, संगीता अग्रवाल, अश्फाक कुरेशी, आशिष वंजारी, दिपंकर गणवीर, सुभाष सोमकुवर, उदास बन्सोड, विलास बन्सोड, अंकुश बांबोर्डे आदी मान्यवर उपस्थित होते.

महाप्रसाद वितरण कार्यक्रमा निमित्त मंदिर परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. फुलांची तोरणे, पताका आणि विद्युत रोषणाईने संपूर्ण परिसर आध्यात्मिक तेजाने उधळून निघाला होता. या भव्य महाप्रसादाच्या तयारीसाठी सकाळपासूनच भाविकांनी उत्साहाने सहभाग घेतला. पारंपारिक पद्धतीने स्वच्छतेची आणि सात्विकतेची काळजी घेत विविध पदार्थांची तयारी करण्यात आली होती. तसेच गोडधोड पदार्थांचा समावेश असलेल्या महाप्रसादाने भक्तांची मने जिंकली. या भव्य महाप्रसादाचे वितरण शुभारंभ सायंकाळी ७ वाजता माजी राज्यमंत्री ॲड सुलेखा कुंभारे यांच्या हस्ते करण्यात आले. सुरुवातीपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. भाविकांनी शिस्तबद्ध रांगा लावून महाप्रसादाचा आस्वाद घेतला. सेवाभावाने प्रेरित होऊन श्री निंबाजी कौशल्य विकास संस्थेचे पदाधिकारी सदस्यगण तसेच भाविकांनी पाणीपुरवठा, जेवण वाढणे, स्वच्छता यासारख्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. बराच वेळ सुरू असलेले महाप्रसादाचे वितरण सुरळीत पार पडले. दरम्यान भक्तांनी भक्तिभावाने हनुमानाचे दर्शन घेत प्रार्थना केली. संपूर्ण वातावरणात एक प्रकारची अध्यात्मिक ऊर्जा आणि समाधानाची अनुभूती सर्वांना मिळत होती. हनुमान जयंतीच्या या मंगलमय पर्वावर आयोजित या महाप्रसाद वितरण कार्यक्रमात निंबाजी अखाडा परिसर अक्षशा भक्तीरसात न्हाऊन निघाला होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री निंबाजी कौशल्य विकास संस्थाच्या समस्त पदाधिकारी सदस्यगन व भावीकानी मोलाची भूमिका पार पाडली.

## मराठी मालिकांचा वास्तववादी आरसा की टी.आर.पी चा खेळ ? दोन्ही बाजूचा विचार आवश्यक

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०६, माथेरान :** मराठी दूरदर्शनवर सध्या सुरू असलेल्या लक्ष्मी निवास, सावळ्याची जणू सावली, सनई चौघडे, कमळी यांसारख्या मालिकांबाबत समाजात दोन ठळक मतप्रवाह दिसून येतात. एक बाजू या मालिकांवर तीव्र टीका करते, तर दुसरी बाजू त्यामागील वास्तव आणि गरज अधोरेखित करते.टीकेची बाजू पाहिली, तर अनेक मालिकांमध्ये सुरुवातीला कुटुंबातील नाती, संस्कार आणि सकारात्मकता दाखवली जाते; मात्र काही भागांनंतर कथानक कटकारस्थान, वाद-विवाद आणि नकारात्मकतेकडे वळते. दोन भाग चांगले आणि पुढील अनेक भाग केवळ भांडणं, संशय, सूड या गोष्टींमध्ये अडकलेले दिसतात. त्यामुळे मनोरंजन या नावाखाली प्रेक्षकांना चुकीचे संदेश दिले जात असल्याची भावना निर्माण होते. टीआरपी वाढवण्यासाठी कथानक कृत्रिम रीत्या लांबवले जाते, असेही आरोप होतात. यामध्ये एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या मालिकांना परवानगी देणाऱ्या यंत्रणा.इन्फॉर्मेशन अँड बोर्ड कास्टिंग ? बोडकास्टिंग कॉन्टॅक्ट बीसीसीसी ? आणि चित्रपटांसाठी सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेट सी बी एफ सी ? यांसारख्या संस्था अस्तित्वात असतानाही अशा प्रकारचा आशय कसा प्रसारित होतो, हा प्रश्न उपस्थित केला जातो.मात्र दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. टीव्ही मालिका हा एक व्यावसायिक उद्योग आहे.

प्रेक्षकांना गुंतवून ठेवण्यासाठी संघर्ष, ट्विस्ट आणि नाट्य आवश्यक मानले जाते. सर्व काही सुरळीत आणि सकारात्मक दाखवले, तर प्रेक्षकांची रुची कमी होऊ शकते, अशी निर्मात्यांची धारणा असते. शिवाय, या मालिकांमध्ये दाखवले जाणारे वाद-विवाद हे समाजातील वास्तवाचेच प्रतिबिंब असल्याचेही काहींचे मत आहे. टीआरपी हा देखील महत्त्वाचा घटक आहे. प्रेक्षक ज्या प्रकारच्या मालिकांना प्रतिसाद देतात, त्याच प्रकारचा आशय अधिक प्रमाणात तयार होतो. म्हणजेच प्रेक्षकांची निवडही या ट्रेंडसाठी काही प्रमाणात जबाबदार आहे. तसेच, दीर्घकाळ चालणाऱ्या मालिकांमुळे अनेकांना रोजगार मिळतो, ही एक वस्तुस्थिती आहे.



मालिकांची ५० ते ५२ भागांची मर्यादा असावी का, हा प्रश्नही येथे उपस्थित होतो. मर्यादा ठेवल्यास कथानक दर्जेदार आणि नेमके राहू शकते; परंतु त्याचा उद्योगावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेवटी, या संपूर्ण चर्चेचा निष्कर्ष एकच - प्रश्न मालिका चांगल्या की वाईट असा नाही, तर त्या कितपत संतुलित आहेत हा आहे. मनोरंजनासोबत सामाजिक जबाबदारी जपणे, आणि प्रेक्षकांनीही सजगपणे निवड करणे - यातूनच योग्य मार्ग सापडू शकतो.

## कुंडलवाडीत तलवारीसह फिरणाऱ्या तरुणाला पोलिसांनी ठोकल्या बेड्या; शस्त्र जप्त



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०५, कुंडलवाडी (नांदेड) :** शहरात दहशत पसरवण्याच्या किंवा एखादा गंभीर गुन्हा करण्याच्या इराद्याने धारदार तलवार बाळगणाऱ्या एका १९ वर्षीय तरुणाला कुंडलवाडी पोलिसांनी रंगेहाथ पकडले आहे. ही कारवाई दि.०४ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास बसस्थानक परिसरातील श्री महालक्ष्मी मंदिर परिसरात करण्यात आली. हर्ष उर्फ हर्षसिंग हाणमंत इंगळे (वय १९ वर्ष, रा. इंदिरा नगर, गल्ली क्र. १२, तरोडा बुद्रुक, नांदेड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हर्ष हा कुंडलवाडीतील महालक्ष्मी मंदिर परिसरात संशयास्पदरीत्या वावरत असल्याची माहिती कुंडलवाडी पोलिसांना मिळाली होती. सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने त्याला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे शासनाने प्रतिबंधित केलेले ३१ इंच लांबी आणि २७इंच मूठ असलेली एक धारदार तलवार मिळून आली. या कारवाईत पोलिसांनी ६,५०० रुपये किमतीची तलवार आणि १०,००० रुपये किमतीचा मोबाईल फोन असा एकूण १६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीविरुद्ध कुंडलवाडी पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ४ आणि २५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास कुंडलवाडी पोलीस करीत आहेत.

## जिल्ह्यात एनडीआरएफ आणि एसडीआरएफ च्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, ठाणे :** नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या काळात 'गोल्डन अवर'मध्ये मिळणारी मदत जीवावरचे संकट टाळू शकते, हे ओळखून जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापनाची विशेष मोहीम राबविली जात आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून, उल्हासनगर महानगरपालिकेच्या सिंधूभवन सभागृहात एनडीआरएफ (NDRF) आणि एसडीआरएफ (SDRF) च्या माध्यमातून प्रशिक्षण शिबिर नुकतेच पार पडले.

निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.संदीप माने यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. अनिता जवंजाळ यांच्या समन्वयातून या मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात आपत्ती म्हणजे काय आणि तिचे विविध प्रकार कोणते, यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कोणत्याही आपत्तीच्या वेळी घटनास्थळी उपस्थित असणाऱ्या 'प्रथम-प्रतिसादक' (First Responder) व्यक्तीची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. या पार्श्वभूमीवर या प्रशिक्षणात जीवनरक्षक प्रथमोपचार अपघाताच्या वेळी जखमीला तातडीने कशी मदत करावी :-

* सी.पी.आर. (CPR) : हृदयविकाराचा झटका किंवा श्वास थांबल्यास जीव कसा वाचवावा
* बँडेज तंत्र : रक्तस्त्राव रोखण्यासाठी विविध प्रकारचे बँडेज बांधण्याचे कौशल्य
* टाकाऊतून टिकाऊ सुरक्षा : घरातील टाकाऊ वस्तूंपासून आपत्कालीन




सुरक्षा साधने कशी बनवावीत आणि त्यांचा वापर कसा करावा, या बाबींचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात आले.

या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाला उल्हासनगर महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, स्थानिक स्वयंसेवक, नागरी संरक्षण दल, सफाई कर्मचारी, सुरक्षा रक्षक आणि अग्निशमन दलाचे जवान मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच तरुण पिढीचा सहभाग वाढविण्यासाठी एनसीसी (NCC), एनएसएस (NSS) आणि विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी, महसूल विभागाचे नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, तहसीलदार कार्यालयातील कर्मचारी आणि 'आपदा मित्र-सखी' यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. आपत्तीच्या वेळी घाबरून न जाता शास्त्रीय पद्धतीने मदत कार्य केल्यास जीवितहानी किमान राखता येते. हे प्रशिक्षण प्रत्येक नागरिकाला सक्षम बनविण्यासाठी आयोजित करण्यात आले आहे., असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# जनगणनेचे काम अचूक, पारदर्शक आणि गांभीर्याने करा - जिल्हाधिकारी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** जनगणनेचे काम हे राष्ट्रीय कर्तव्याचा भाग आहे. १५ वर्षांनंतर जनगणना होत असून ही संपूर्ण प्रक्रिया डिजीटल पध्दतीने करण्यात येत आहे. त्यामुळे अधिकारी - कर्मचाऱ्यांनी अचूक, पारदर्शकपणे आणि गांभिर्याने जनगणनेचे काम करावे, अशा सुचना जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या बैठकीला मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, सहायक जिल्हाधिकारी लघिमा तिवारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, उपजिल्हाधिकारी संजय पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) नुतन सावंत, उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम (चंद्रपूर), संदीप भस्के (वरोरा), अजय चरडे (मुल), पर्वणी पाटील (ब्रम्हपुरी), अर्जुन पावरा (बल्लारपूर), किशोर घाटगे (चिमूर) यांच्यासह सर्व तहसीलदार उपस्थित होते. शासनाने दिलेल्या निर्देशानुसार आणि ठराविक वेळेत जनगणनेचे काम करणे आवश्यक आहे, असे सांगून जिल्हाधिकारी पंत म्हणाल्या, जास्तीत जास्त शिक्षकांची या कामासाठी नियुक्ती करावी.

अधिकारी - कर्मचाऱ्यांनी




जनगणनेबाबत असलेले प्रशिक्षण गांभिर्याने करावे. संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन असल्यामुळे या कामाचा विभागीय तसेच शासन स्तरावर नियमित पाठपुरावा होणार आहे.

सर्व उपविभागीय अधिकाऱ्यांनी आपल्या अधिपत्याखालील तहसीलदार व संपूर्ण यंत्रणेचा आढावा घ्यावा. ऑनलाईन पध्दतीने स्वत: माहिती भरण्यासाठी नागरिकांना प्रवृत्त करावे. एक टीमवर्क म्हणून जनगणनेचे काम केले तर अचूक आणि पारदर्शकपणे काम होण्यास मदत होईल. अधिकाऱ्यांनी जनगणनेचा कायदा, त्यात असलेल्या तरतुदी, झालेले बदल आदी बाबी लक्षपूर्वक वाचाव्यात. तसेच या कामात स्वत: लक्ष द्यावे. केवळ कर्मचारी किंवा ऑपरेटरच्या भरोश्यावर अवलंबून राहू नये. जनगणनेचे काम करण्यास कर्मचारी टाळाटाळ करीत असेल तर त्यांच्यावर योग्य कारवाई करावी, अशाही सुचना जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दिल्या. यावेळी त्यांनी जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलिंडरची उपलब्धता तसेच चंद्रपूर (ब्रम्हपुरी) - भंडारा समृध्दी महामार्ग, नागपूर - चंद्रपूर महामार्ग आणि वर्धा - बल्लारशहा तिसरी आणि चवथ्या रेल्वे लाईनकरीता भुसंपादन प्रक्रियेची माहिती जाणून घेतली. एस.आय.आर. बाबत आढावा निवडणूक आयोगाच्या वतीने आगामी काळात छायाचित्र मतदार याद्यांचा सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (एस.आय.आर.) हाती घेण्यात येणार आहे.

या पार्श्वभुमीवर जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी एसआयआर मोहिमेचा आढावा घेतला. जिल्ह्यात एसआयआर मोहीम सुरू होण्यापुर्वी सर्व उपविभागीय अधिकाऱ्यांनी प्राथमिक तयारी करून ठेवावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी संजीव देशमुख यांनी सादरीकरण केले.